सैनिक कल्याण विभागाची www.mahasainik.maharashtra.gov.in या वेबसाईटचे नुतणीकरण करणेसाठी येणा-या रू.२०,००,०००/- इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२७०/मासैक
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दिनांक : ०२.१२.२०२४.

वाचा-

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३(भाग-२), दिनांक १७ एप्रिल २०१५
२. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पुणे यांचे पत्र क्र.११०२५/सं.स्थ./सैकवि-१, दिनांक ०९.१०.२०२४.

प्रस्तावना-

सैनिक कल्याण विभागामार्फत, राज्यातील माजी सैनिक, माजी सैनिकांच्या विधवा पत्नी, त्यांच्यावर अवलंबितांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. याकरिता माजी सैनिकांचे व त्यांच्या कुटुंबियांचे दाखले, पुरावे व इतर कागदपत्रांची आवश्यकता असते. सदर कागदपत्रे जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय व सैनिक कल्याण विभाग, पुणे कार्यालयास सादर करावी लागतात.तदनुषंगाने सैनिक कल्याण विभाग, पुणे कार्यालयातील तयार केलेली वेबसाईट ला माहिती व तंत्रज्ञान विभागा मार्फत www.mahasainik.maharashtra.gov.in असे Domain name Register करण्यात आले आहे. सदर वेबसाईटचे दिनांक २५ जानेवारी २०२२ रोजी होस्टींग झालेआहे. सदर संकेतस्थळाच्या Cloud Space-१ ची सेवा ०६ ऑक्टोबर २०२४ रोजी संपुष्टात आलेली आहे. तसेच माजी सैनिक/विधवा/अवलंबित यांच्या नोंदणीसाठी Cloud Space-२ ची वैधता दि. ०७ डिसेंबर २०२४ रोजी समाप्त होत आहे. सबब सदर संकेतस्थळाच्या सर्व सेवा सुरळीत व नियमितपणे कार्यरत ठेवण्यासाठी अंदाजीत खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

सैनिक कल्याण विभाग, पुणे कार्यालयाच्या www.mahasainik.maharashtra.gov.in या वेबसाईटचे नुतणीकरण करणेसाठी येणा-या रु. २०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लाख फक्त/-) इतक्या अंदाजित खर्चास या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. सदरचा खर्च " २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण, ६० इतर सामाजिक व कल्याण कार्यक्रम, २०० इतर कार्यक्रम (००) (०३) सैनिक कल्याण विभाग, (२२३५००५१), १७-संगणक खर्च "या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या वित्तिय वर्षाच्या खर्च खाती टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभाग, शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३, भाग-२ दिनांक १७ एप्रिल २०१५, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, भाग पहिला, उपविभाग दोन महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम ७६ नुसार प्रशासकीय विभागास दिलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०२४१२०२१५५८२२३९०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

URMILA POPAT SAWANT

Digitally signed by URMILA POPAT SAWANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=GENERAL ADMINISTRATION DEPARTMENT, 2.5.4.20=532e1c167ebaaff43f5811aa7e45b8f790eb47c4f4cdf5bad586d61ab9901df2, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=C586C9348CA72192AB033313815E031BC4374F8A3A8575A392F3FE875E8661EC, cn=URMILA POPAT SAWANT
Date: 2024.12.02 15:59:55 +05'30'

( उर्मिला सावंत )
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१.मा. राज्यपाल यांचे सचिव.
२.मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव/ खाजगी सचिव.
३. महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर,
५. महालेखापाल (स्थानिक निकाय लेखा परीक्षा व लेखा) महाराष्ट्र, मुंबई-३२,
६. संचालक, सैनिक कल्याण विभाग, पणे,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
८. सह संचालक, लेखा व कोषागार, संगणक कक्ष, ५ वा मजला, नवीन प्रशासन भवन, मुंबई ३२,
९. वित्त विभाग (व्यय ४) ,मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
१०. सामान्य प्रशासन विभाग/ कार्यासन २५, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
११. निवड नस्ती (२ प्रती),
१२. संग्रहार्थ.